## शंका आणि खुलासा

| क्रमांक | शंका | खुलासा |
|---|---|---|
| १) | जन्म आणि मृत्युची माहिती नोंदणी रजिस्टर ज्या भाषेत नोंदवले जाते त्या भाषेच्या व्यतिरिक्त अन्य भाषेत देता येते का? | नोंदणी रजिस्टरमध्ये ज्या भाषेत नोंदणी केली आहे त्याच भाषेत नोंदणीचा तपशील दिला जावा. निबंधकाने ही माहिती अन्य भाषेत दिली तरी हरकत नाही. मात्र या प्रतीवर अगदी वरच्या बाजूला 'भाषांतरीत प्रत' असे ठळकपणे लिहायला हवे. |
| २) | जन्म आणि मृत्युची घटना जिथे घडली असेल त्या स्थळाऐवजी अन्य ठिकाणी तिची नोंद करता येते का? उदा. – जर एखादी घटना मुंबईत घडली असेल तर ती गोव्यात नोंदविता येते का? | घटना जिथे घडली असेल तेथेच तिची नोंद व्हायला हवी. एखादी घटना जर मुंबईत घडली असेल तर तिची नोंद मुंबईतील त्या भागातल्या निबंधकाकडेच करावी लागेल. ती घटना गोव्यात नोंदविता येणार नाही. |
| ३) | जन्म–मृत्यु नोंदणीचा अधिनियम १९६९ च्या कोणत्या कलमान्वये घटनेचे नोंद ती जिथे घडली असेल त्याच ठिकाणी केली पाहिजे अशी तरतूद आहे. | जन्म–मृत्यु नोंदणीचा अधिनियम १९६९ च्या कलम ७ (२) आणि कलम २३ (२) अन्वये निबंधकाने केवळ त्याच्या भागात घडणाऱ्या जन्म–मृत्युचीच नोंद करावी असे स्पष्टपणे म्हटले आहे. |
| ४) | एखाद्या अर्भकाचा जन्म शहरात एखाद्या रुग्णालयात झाला तर त्याची नोंद ते रुग्णालय ज्या भागात आहे त्या भागाच्या जन्म–मृत्यू नोंदणी निबंधकाने करावी की ते कुटुंब ज्या भागात राहते त्या भागातील निबंधकांकडे त्याची नोंद केली तर चालू शकेल? | एखाद्या रुग्णालयात अर्भकाचा जन्म झाला तर त्या घटनेची नोंद ते रुग्णालय ज्या भागात आहे त्याच भागातील निबंधकाकडे करणे आवश्यक आहे. नोंदणी ही घटनेच्या जागीच केली जात असल्यामुळे ती अन्यत्र (कुटुंब ज्या भागात राहते त्या भागातील निबंधकांकडे) करता येणार नाही. |
| ४) | या कायद्यातील तरतूदीनुसार आणि शासनाच्या नियमाप्रमाणे मृत जन्माचा दाखला मिळू शकतो का? | कायद्याच्या कलम २ (१) (अ) नुसार जन्म या शब्दाचा अर्थ जिवंत जन्म अथवा मृतजन्म असा होतो. त्यामुळे मृतजन्माची नोंद असलेल्या रजिस्टरमधील माहिती (नमुना क्र. ९) नमुना ५ अन्वयेही शब्दात योग्य बदल करून देता येते. उदा. पुढील माहिती मृत जन्माची नोंद असलेल्या रजिस्टरमधील मूळ माहितीवरून घेण्यात आली आहे व त्यानुसार मृतजन्माची तारीख आणि ठिकाण हे आहे. यात त्या नमुन्यामधील जन्म या शब्दाऐवजी 'मृतजन्म' असा शब्द वापरावा लागेल. |

### मुलाच्या नावाची नोंदणी (कलम १४)

आपल्या देशात अर्भकाचं नाव अगदी लहानपणी ठेवण्याची परंपरा आहे. अनेक वेळा बाळाचं टोपण नाव ठेवलं जाते आणि त्याला शाळेत घालताना नाव निश्चित केले जाते. अनेक वेळा बाळाचे नाव तो दहावीच्या वर्गात असताना निश्चित केले जाते. बाळाचा जन्म झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत त्याचे नाव निश्चित केले जाणार नाही हे लक्षात घेऊन बाळाचे नाव ठेवलेले नसतानाही त्याच्या जन्माची नोंद करण्यास परवानगी देण्यात आली आहे. या संदर्भातील कायद्यातील तरतुदींची (कलम १४) आपण इथे माहिती घेऊ.

**३ अ.१०** जर बाळाचं नाव ठेवण्याच्या आधी त्याच्या जन्माची नोंद केली गेली तर त्याच्या नोंदणी दिनांकापासून १२ महिन्यांपर्यंत नोंदणी रजिस्टरमध्ये त्याच्या नावाचा समावेश विलंब शुल्क न घेता करता येतो. निबंधकाला त्याच्या नावाची तोंडी अथवा लेखी माहिती दिली की अशी नोंद करता येते.

शासनाच्या नियमानुसार अशा बाळाचं नाव त्याच्या नोंदणी दिनांकापासून १२ महिन्यानंतर पण १५ वर्षांच्या आत रजिस्टरमध्ये नोंदविता येते. त्याच्या आई–वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार ते नोंदविता येतं. मात्र त्यासाठी विलंब शुल्क (रु ५) आकारले जाते. ही मुदत पुढीलप्रमाणे ठरवली जाते.

बालकाच्या जन्माची नोंद घटना घडल्यापासुन २१ दिवसाचे आत त्याच्या / तिच्या नावाशिवाय सुध्दा करण्याची तरतुद कायद्यात आहे.

१) जर अशी नोंदणी जन्म आणि मृत्यू नियम (दुरुस्ती १९८५) लागू होण्यापूर्वी केली असेल तर त्या तारखेपासून किंवा

२) जर अशी नोंदणी जन्म आणि मृत्यू नियम (दुरुस्ती १९८५) लागू झाल्यानंतर केली असेल तर त्या नोंदणीच्या तारखेपासून पण कलम २३ च्या पोटकलम ४ मधील तरतूदीनुसार.

**तुम्ही हे करू शकता —**

अ) जर नोंदणीचे रजिस्टर तुमच्याजवळ असेल तर तुम्ही मुलाचे नाव संबंधित नमुन्यामधील योग्य त्या रकान्यात ठरवून देण्यात आलेले विलंब शुल्क घेऊन नोंदवू शकता.

ब) जर नोंदणीचे रजिस्टर तुमच्याजवळ नसेल आणि संबंधित व्यक्तीने तोंडी माहिती दिली तर योग्य ती माहिती लिहून तुम्ही एक कागद तुम्ही त्या व्यक्तीकडून ठरवून दिलेले विलंब शुल्क घेऊन विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडे नोंदणीसाठी पाठवा.

सदर मुलाचे आई–वडील किंवा पालक यांनी नावाची नोंद करताना तुम्हाला त्यांच्याकडे असलेल्या जन्माच्या नोंदीची माहिती जी त्यांना कलम १२ नुसार मिळाली असेल किंवा जन्माच्या दाखल्याची प्रमाणित प्रत जी त्यांना कलम १७ नुसार मिळाली असेल ती दाखवू शकतात  व त्या नुसार तुम्ही मुलाच्या नावाचा समावेश करावा आणि उपकलम (१) च्या भाग (ख) अन्वये पुढील कारवाई करावी.

या अधिनियमान्वये बाळाची जन्माची नोंद नावासह किंवा नावाशिवाय २१ दिवसांपर्यंत करण्याची मुदत असली तरी जन्म नोंदणी दिनांकापासून १ वर्षापर्यंत बालकाच्या नावाची नोंद विनाशुल्क करता येते व त्यानंतर १५ वर्षानंतर विहीत शुल्क  (रु ५) भरून करता येऊ शकते; परंतु या मुदतीनंतर  मात्र जन्माच्या नोंदीत नावाचा समावेश करता येत नाही. कायद्यातील ही बाब तुम्ही लोकांच्या नजरेला स्पष्ट आणायला हवी.

## नोंदीत दुरुस्ती करणे किंवा नोंद रद्द करणे (कलम १५)

सर्वसाधारणपणे जन्म आणि मृत्युच्या नोंदीत कोणताही बदल करण्यास परवानगी दिली जात नाही. पण काही विशिष्ट परिस्थितीत या नोंदीत दुरुस्ती करण्याची किंवा ती रद्द करण्याची या अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे. नोंदीत दुरुस्ती करणे अथवा नोंद रद्द करणे हा विषय अधिनियमाच्या कलम १५,राज्य नियम ११ मध्ये स्पष्ट करण्यात आला आहे. अधिनियमाच्या या भागात या संदर्भात होणाऱ्या चुका आणि नोंदीतील दुरुस्ती किंवा नोंदी रद्द करणे याबाबतची चर्चा करण्यात आली आहे. या संदर्भातील चुकांचे प्रामुख्याने तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या अशा: लेखनातील किंवा औपचारिक चुका, मजकुरातील चुका आणि हेतूपुरस्सर वा अयोग्यपध्दतीने केलेली नोंद.